# ४ गोमातेचा पोवाडा

(चाल-चंद्रकांत) कोल्हापूरचा शाहिर आता उर्फ कडवाड कुमणी |
गोमातेचा गातो (गाई) पवाडा शांत बसा विनवी ||
ज्या काळाचें ज्ञान मिळवितो धकळा इतिहास |
तेव्हांपासुन अम्हीं मानिलें पवित्र गाईस ||
वेदग्रंथ हा अमूल्य ठेवा हिन्दुस्थानास | (आपुल्या राष्ट्रास)
त्या वेदांमधिं गोपूजेचा स्पष्टचि आदेश ||

(चाल) गोमाता आमुची मानबिंदू | सर्व आम्ही हिंदू | चला तिज वंदू |
करूं या गोमातेचा जयजयकार || उंच असताना शिरपुं कळकारी |
बंद करूं गोमातेचा संहार ||
पावित्र्याची गाय ही मूर्ति | थोर जिची कीर्ति | पुराणें वर्णिती |
देवदेवता जिच्या पोटीं || सर्व नांदती तेतीस कोटी | म्हणुन गाईची
महती मोठी ||

(चाल) प्राचीन काळापासुन भरतखंडानं घेतानं वाण ||
करूं प्राणपणानं गोमातेचं रक्षण ||
होऊं धष्टपुष्ट गोदुग्धं करुनि प्राशन ||
आमुचा असे हा धर्मचि गोपालन ||

(चाल) रघुवंशांतील नृप थोर | दिलीपाची कथा मशहूर ||
गाईला माय मानून | करि सेवा मनोभावानें ||
गाईंचं करण्या रक्षण | देई सिंहमुखीं गर्दन ||

(चाल) चला आतां जाऊं गोकुळा | देवकीच्या बाळा | पाहूं गोपाळा |
जाऊं कृष्णाच्या भेटीसाठीं || कुठें तो असेल जगजेठी | रानीं वनीं
गाईंच्या पाठीं ||

हा देश गायभक्तांचा । नाही कसायांचा । सत्य ही वाचा । बाळ श्रीशिवप्रभू सांगे गर्जुन ॥ म्यानांतुन खड्ग बाहेर उपसून । हात कसायाचा शकल छाटून ॥

(चाल) (दोहरा) बाबरानं काढलं फर्मानाला । गोवध राज्यांत बंद केला ।
हुमायुनास मंत्र दिधला । बंदी कर गाईच्या हत्येला ।
हुमायुन सांगतोय बापाला । चिंता नका करू काळजाला ।
आपला हुकूम मान्य मजला ॥ खरोखरी ॥ दादा ॥
दिली शिकवण अकबराला । दुखवू नको हिंदु भावनेला ।
गाय प्राणांहूनी प्यारं त्यांनला । बंदी कर गाईच्या हत्येला ।
गाय ही मातच हिंदूला । जर का तिचा वध केला ।
क्रोध फार येईल हिंदूला । जिता नाही ठेवणार आपणाला ॥
खरोखर ॥ दादा ॥

(चाल) गोपूजकांचा हा देश । आपुला भारतवर्ष ॥
गोपालन ज्यांचे ब्रीद । त्यांना मिळत नाही गोदुग्ध ॥
गोरक्षण ज्यांचे ब्रीद । देशांत त्यांच्या गोवध ॥
विसरलो आम्ही स्वाभिमान । म्हणुन आला काळ दारुण ॥
गोवध आम्हां लांछन । देशाचा घोर अपमान ॥
अपमान शल्य उपटून । टाकू या मुळापासून ॥
आता हिंदुस्थान आझाद । चला करू गोहत्या बंद ॥

(चाल) गोमाता आमचा मानबिंदू । सर्व आम्ही हिंदू । चला तिला वंदू । करू या गोमातेचा जयजयकार ॥ उंच अस्मानी घुमे (घुमत) ललकार । वसंतराय शाहीर कवन गाणार ॥

मुम्बई (१९५८ साली रचना) ——x——
(हा पोवाडा नेने चाळ, गिरगांव येथे गोपाष्टमी सप्ताहांत गायिला.)